

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित

# भारतीय महविद्यालय, मोर्शी.

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर अहवाल

(पार्डी, ता. मोर्शी, जि. अमरावती.)

शिक्षीत भारत - स्वस्थ भारत – स्वावलंबी भारत – संपन्न भारत –

एक भारत – श्रेष्ट भारत

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित

# भारतीय महविद्यालय, मोर्शी.

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर
## दत्तक ग्राम पार्डी

## अहवाल

०७/०२/२०२० ते १३/०२/२०२०

# भारतीय महाविद्यालय मोर्शी जि. अमरावती.

## *विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम पार्डी *

**स्थळ :- पार्डी, ता. मोर्शी, जि. अमरावती.**

**दिनांक :- ०६ फेब्रुवारी २०२० ते १३ फेब्रुवारी २०२०**

आमच्या महाविद्यालयाचे २०२०-२०२१ या शैक्षणिक सत्रातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक ०७ फेब्रुवारी २०२० ते १३ फेब्रुवारी २०२० या दरम्यान दत्तक ग्राम पार्डी, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे आयोजित करण्यात आले . कार्यक्रम अधिकारी रा.से.यो. चे डॉ. सावन मा. देशमुख तसेच लाजवंती टेंभूणे (महिला कार्यक्रम अधिकारी रा.से. यो.) यांच्या सहकार्याने पार्डी या गावात विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित केल्या कारणाने भारतीय महाविद्यालयातील रा.से. यो.च्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला व सर्व विद्यार्थ्यांना दि. ०५/०२/२०२० बुधवार रोजी हमीपत्र देण्यात आले. आणि ०६/०२/२०२० रोजी सर्व स्वयंसेवकांना महाविद्यालयात सकाळी ०९ वाजता हजर राहण्यास सांगितले शिबिराकरिता लागणारे जे काही साधन आहेत ते पार्डी या गावी नेण्याकरीता २ ट्रॅक्टर होते. तसेच विद्यार्थ्यांना पोहचण्याकरीता २ गाड्या (कार/ स्कुल व्हॅन उपलब्ध केल्या व सर्व स्वयंसेवकांना १० वाजता पार्डी या गावात पोहचवण्यात आले.

सर्वप्रथम स्वयंसेवकांची नोंदणी करण्यात आली त्यानंतर सर्वांनी सभागृहाची तसेच आजू-बाजूचा परिसर स्वच्छ केला. त्यानंतर गावक-यांशी चर्चा केली. व त्यांच्या अडचणी जाणुन घेतल्या. रा.से.यो. चे अधिकारी डॉ. सावन मा. देशमुख तसेच लाजवंती टेंभूणे (महिला कार्यक्रम अधिकारी रा.से. यो.) यांनी विद्यार्थ्यांची गट नियुक्ती केली आणि प्रत्येक गटाला दररोज होणा-या कार्यक्रमाची जबाबदारी सोपविली. संध्याकाळी ५ वाजता प्रभातफेरी काढण्यात आली व ६ वाजता प्रार्थना केली.

## दिनांक :- ०७/०२/२०२० ( शुक्रवार )

सकाळी ठीक ४ वाजता सर्व स्वयंसेवकांना उठले व ५ वाजता प्रा. लाजवंती टेंभूणे यांनी गावात विद्यार्थ्यांना प्रभातफेरी करिता नेले गाव साफ केले. सर्वांच्या घरासमोर रांगोळी सुद्धा काढण्यात आल्या आणि परत ५.३० ला सभागृहात परतलो. त्यांनंतर ६ वाजता प्रार्थना व योगासन घेण्यात आले. ८ ते ९ वाजता गावात जाऊन श्रमदान केले आणि ९.३० ते १०.३० या कालावधीत स्मशानभूमी साफ़ केली आणि काही विद्यार्थ्यांनी शोषखड्डा खोदण्यास सुरुवात केली आणि ठीक ११ वाजता शिबिराचे उद्धाटन मा. डॉ.रमेश भ. बिजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर अमरावती ) तसेच कार्यक्रमाला उपस्थित असलेले प्रमुख अतिथि म्हणून मा. ॲड. यदुराज मेटकर (सरचिटनिस, भारतीय विद्यामंदिर अमरावती) व तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील प्रा. डॉ. सुरेश भ. बिजवे यांनी भूषविले व कार्यक्रमाला उपस्थित असलेले मुख्य अतिथि मा. डॉ. राजेश बुरंगे (प्रभारी संचालक, रा.से.यो. सं.गा. बा. अमरावती विद्यापीठ अमरावती ) मा. प्रा. माणिक तु. देशमुख (माजी गाडगे बाबा अध्यासन प्रमुख सं.गा. बा. अमरावती विद्यापीठ अमरावती) मा. श्री. तात्या साहेब संगेकर (जेष्ठ रंगकर्मी अम.) मा. श्रीमती निधि अमरकुमार पेठे (प्रसिद्ध उद्योजक मोर्शी.) मा. श्री. नथ्थुजी संपतराव घोंगडे (सरपंच, ग्रामपंचायत पार्डी ) मा. फरजाना शेख शहीद (उप-सरपंच, ग्रामपंचायत पार्डी) मा.श्री. विजय ठाकरे (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिति पार्डी ) मा.श्री. दिलीप वसु (मुख्याध्यापक, जि.प. शाळा पार्डी) मा. श्री. प्रफुल्ल खांडेकर (अध्यक्ष, गुरुदेव सेवा मंडळ पार्डी) इत्यादी मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली आणि उद्धाटन सोहळा पार पाडला.

सायं ६.३० ते ७ प्रार्थना करण्यात आली त्यानंतर ७ ते ७.३० या कालावधीत भोजनाचा कार्यक्रम आटपुन लोकजागर पंचरंगी सांस्कृतिक कार्यक्रमाची ८ वाजता सुरवात झाली. व ११.३० च्या दरम्यान कार्यक्रम संपूष्टात आला.

**<u>दिनांक :- ०८/०२/२०२० (शनिवार)</u>**

पहाटे ५ उठून आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला ५.३० ला कॅम्पस मध्ये परत येउन योगासन व प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर ७ वाजता प्रभातफेरी काढण्यात आली सकाळी ९ ते ११ या दरम्यान श्रमदान करण्यात आले. श्रमदान झाल्यानंतर ११.३० ला आरोग्य तपासणी शिबिर तथा भव्य रक्तदान शिबिर आयुर्वेदिक महाविद्यालय अमरावती आणि रक्तपेढी जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांच्या वतीने हे शिबिर पार पाडल्या गेले. तसेच ३ ते ५ च्या दरम्यान बौद्धिक सत्र पोषण आहार सत्राला सुरुवात होवून सत्राला उपस्थित असलेले अध्यक्ष प्रा. डॉ. शिरीष टोपरे (भारतीय महा. मोर्शी )व तसेच वक्ते मा. प्रा. डॉ. वैशाली देशमुख मैडम (पोषण आहार तज्ञ) तसेच प्रमुख अतिथि प्रा. गोपाल भलावी व सौ. जयश्रीताई इंगळे व आशाताई भोयर यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला.

सायं 6.3० ते ७ वाजेपर्यंत प्रार्थना करण्यात आली व ८ वाजता झंकार पंचरंगी सांस्कृतिक कार्यक्रम मा. रिजावानूदिन पटेल (नेत्रहीन कलावंत) चिचफैल यांच्या हस्ते पार पडला. मा. रिजावानूदिन पटेल यांनी आपल्या जिवनातील आलेले अनुभव व्यक्त केले. आणि आंधळा व्यक्ति हां एक उत्कृष्ट कलाकार घडवू शकतो. असे त्यांनी आपल्या प्रबोधनात विद्यार्थ्यांना व गावातील लोकांना पटवून दिले.

**<u>दिनांक :- ०९/०२/२०२० (रविवार)</u>**

पहाटे ५ उठून आजूबाजूचा परिसर स्वच्छ करुन व त्यानंतर गावामध्ये फिरून आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला. प्रत्येक घरासमोर लहान का होईना रांगोळी काढून त्या रांगोळीला N.S.S. हे नावही दिले. त्यानंतर ६ वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. त्यानंतर ७ वाजता प्रभातफेरी काढण्यात आली. आणि ९ ते १२ सर्व स्वयंसेवकांनी श्रमदान केले. त्यामध्ये काही विद्यार्थ्यांनी शोषखड्डा खोदला आणि त्यानंतर ३ ते ५ दरम्यान बौद्धिक सत्राला सुरुवात झाली. त्या सत्राचा विषय पर्यावरण संवर्धन मार्गदर्शन हा होता त्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. डी.एन. काळे (भारतीय महा. मोर्शी) आणि यांनी

पर्यावरणाची निगा ही कशी राखली पाहिजे याबाबत अत्यंत मोलाचे ,मार्गदर्शन त्यांनी केले. व पर्यावरण संवर्धन झाले पाहिजे याबाबत त्यांनी आपले मते प्रकट केली. व वक्ते म्हणून लाभलेले मा. श्री. यादव तरटे पाटील (अध्यक्ष, दिशा फाउंडेशन अमरावती) यांनी ही झाडांची निगा कशी राखली पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. व प्रमुख अतिथि श्री. नितिन निंभोरकर यांनी ही मार्गदर्शन केले. त्यानंतर विश्रांतीच्या कालावधीत खुप सुंदर व मजेदार खेळ हा मा. श्री. देशमुख सर यांनी आम्हाला खेळायला लावला आणि खुप आनंद झाला. व त्याखेळामधून एकता असल्याने कोणतेही काम करणे हे शक्य होते. हा त्या खेळातील मिळालेला सर्वांना संदेश आहे. आणि त्यानंतर सांय. ६ वाजता प्रार्थना आणि त्यानंतर सुंदर भजने व देशभक्तिपर गीते म्हणण्यात आली.

रात्री ८ वाजता बौद्धिक सत्राचा विषय "शेतकरी समस्या व उपाय" (समाज प्रबोधन) शेतक-यांच्या समस्या काय आहे ? व शेतक-यांच्या समस्या असल्यास त्यावर काय उपाययोजना कराव्यात या बाबत बाबत विद्यार्थ्यांना व गावातील नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन करून शेतकरी समस्या व उपाययोजना हे चर्चासत्र पार पाडले तसेच आजच्या शेतक-यांची काय स्थिति आहे. हे सुद्धा प्रभोधनातुन व्यक्त केले.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले प्राध्यापक विनायक खांडेकर (भारतीय महाविद्यालय मोर्शी ) यांनी आपल्या भाषणातुन  शेतक-यांच्या अडचणी चे निराकरण कसे केले पाहिजे या बाबत रा.से.यो. च्या सर्व विद्यार्थ्यांना अतिशय उत्कृष्ठ मार्गदर्शन केले तसेच प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले डॉ. आशीष लोहे व प्रमुख अतिथि म्हणून लाभलेले मा. श्री. संदीप रोडे एक प्रगतीशील शेतकरी असून त्यांनी ही अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले व मा. श्री. नथ्थुजी घोंगडे (सरपंच, ग्रामपंचायत पार्डी ) यांनीही खुप चांगले मार्गदर्शन केले.

## दिनांक :- १०/०२/२०२० (सोमवार)

पहाटे ५ उठून आजूबाजूचा परिसर स्वच्छ करुन व त्यानंतर गावामध्ये फिरून आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला. प्रत्येक घरासमोर लहान का होईना रांगोळी काढून त्या

रांगोळीला N.S.S. हे नावही दिले. त्यानंतर ६ वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. त्यानंतर ७ वाजता प्रभातफेरी काढण्यात आली. आणि ९ ते १२ सर्व स्वयंसेवकांनी श्रमदान केले. त्यामध्ये काही विद्यार्थ्यांनी शोषखड्डा व वनराई बंधारा बांधला.

त्यानंतर ३ ते ५ दरम्यान बौद्धिक सत्राला सुरुवात झाली. बौद्धिक सत्राचा विषय हा राष्ट्रीय सेवा योजना व आजचा युवक हा कसा असावा म्हणजेच रा.से.यो. चा स्वंयसेवक कसा असावा त्यांने शिस्तिचे पालन कसे करावे या सबंधीचा हा विषय होता. या बौद्धिक सत्राला अध्यक्ष म्हणून लाभलेलेअध्यक्ष प्रा. डॉ. संदीप राउत (भारतीय महाविद्यालय मोर्शी) यांनी अध्यक्षाचे स्थान भूषविले आणि त्यांनी आपल्या भाषणातुन राष्ट्रीय सेवा योजना यांचे महत्व पटवून दिले. व सोबतच आजचा युवक हा कसा असावा या बाबत मार्गदर्शन केले. सोबतच कार्यक्रमाला उपस्थित असलेले प्रमुख वक्ते मा. प्रा. डॉ. बी. एस. चंदनकर (सदस्य.महा. विकास समिति भा.म.वि. मोर्शी ) यांनी आपली उपस्थिती दर्शविली व राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय ? हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथि श्री. मोहन गाडवे (सदस्य, ग्रामपंचायत पार्डी) यांनी आपली उपस्थिति दर्शविली होती.

त्याचप्रमाणे सायं ६ वाजता प्रार्थना ही घेण्यात आली त्यानंतर भोजनाचा कार्यक्रम झाला व त्यानंतर रात्रि ८ वाजता मनोरंजनात्मक समाज प्रबोधन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला मा. श्री. विद्याराज कोरे (दुर्गवाडा) यांनी अतिशय उत्कृष्ठ रित्या कार्यक्रम पार पाडला. आणि त्यांनी आपल्या मनोरंजनात्मक शैलीने समाज प्रबोधन ही केले. व सर्वांना भरभरून आनंद वाटला.

## <u>दिनांक :- ११/०२/२०२० (मंगळवार)</u>

पहाटे ५ उठून आजूबाजूचा परिसर स्वच्छ करुन व त्यानंतर गावामध्ये फिरून आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला. प्रत्येक घरासमोर लहान का होईना रांगोळी काढून त्या रांगोळीला N.S.S. हे नावही दिले. त्यानंतर ६ वाजता प्रार्थना व योगासने घेण्यात आली. त्यानंतर ७ वाजता प्रभातफेरी काढण्यात आली. आणि ९ ते १२ सर्व स्वयंसेवकांनी श्रमदान

केले. सर्व स्वयंसेवकांनी वनराई बंधारा बांधला व शोषखड्डे खोदले. त्यानंतर ३ ते ५ दरम्यान बौद्धिक सत्राला सुरुवात झाली. बौद्धिक सत्राचा विषय हा संभाषण कौशल्य होता बौद्धिक सत्राला अध्यक्ष म्हणून लाभलेले भारतीय महाविद्यालय मोर्शी. येथून आलेले प्रा. डॉ. अरविंद पाझारे सर यांनी अध्यक्षीय भाषण अतिशय सुंदर दिले या भाषणात संभाषणाचे कौशल्य (Communication Skill) बद्दल माहिती दिली. त्यानंतर प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले डॉ. दिपाली देशमुख मॅडम (डायरेक्टर, झेनिथ कंसेप्ट स्कुल, मोर्शी) यांनी संभाषण कौशल्याचे प्रकार (Types of Communication Skill) खुप चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांना पटवून दिले. प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित असलेले मा. श्री. सोपान निंभोरकर (सदस्य, ग्रामपंचायत पार्डी) यांनी आपली उपस्थिति दर्शविली

त्यानंतर सांय ६ वाजता प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर भोजनाचा कार्यक्रम झाला व रात्रि ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम (देशभक्तिपर गीत आणि सुर-संगम हा कार्यक्रम घेण्यात आला व "उरी-द सर्जिकल स्ट्राइक" चित्रपटाचे सादरीकरण झाले.

**<u>दिनांक :- १२/०२/२०२० (बुधवार )</u>**

प्रार्थना व योगासन करण्यासाठी सकाळी ६ वाजता घेण्यात आली. व आजुबाजुचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर प्रभातफेरी सकाळी ७ वाजता काढण्यात आली. व ९ ते १२ वाजता श्रमदान केले व त्यामध्ये वनराई बंधारा व शोषखड्डा यांचे काम पूर्ण करण्यात आले. दुपारी ३ ते ५ दरम्यान बौद्धिक सत्राला सुरुवात झाली. महिला सक्षमीकरण आणि लैंगिक शिक्षण या सत्रातील कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ.रजनीश बांबिले (भारतीय महाविद्यालय मोर्शी ) यांनी आपल्या भाषणातुन महिलांवर होणारे अत्याचाराबद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली. बौद्धिक सत्राला वक्ते म्हणून लाभलेल्या सौ. गुंजनताई गोळे (प्रसिद्ध, समाज सेविका अमरावती ) यांनी अतिशय सुंदर महिला सक्षमीकरण व लैंगिक शिक्षण यावर व्याख्यान दिले कशा-कशाप्रकारे स्त्रियांवर अत्याचार होतात. त्या झालेल्या अत्याचारावर प्रत्येक स्त्रीने त्यावर काय केले पाहिजे. हे त्यांनी समजुन सांगितले तसेच प्रमुख

अतिथि म्हणून ॲड. मंजूषा खांडेकर (मोर्शी) लाभल्या त्यांनी लैंगिक शिक्षणा बद्दल माहिती दिली. आणि फरजाना शेख शहीद (उप-सरपंच, ग्रामपंचायत पार्डी ) व भाग्यश्री लुंगे (सदस्य, ग्रामपंचायत पार्डी ), सौ. संगीताताई धावडे (सदस्य, ग्रामपंचायत पार्डी ) यांनीही आपली उपस्थिती दर्शविली.

त्यानंतर ६ वाजता प्रार्थना घेण्यात आली व रात्री ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

**<u>दिनांक :- १३/०२/२०२० (गुरूवार )</u>**

शिबिराच्या शेवटच्या दिवशी सकाळी ११ वाजता शिबिराचे समारोप घेण्यात आले. मुख्य अतिथि म्हणून मा. श्री. अनंतराव सोमवंशी (उपाध्यक्ष, भारतीय विद्या मंदिर, अमरावती) तसेच मा. श्री. सलिल चिंचमलातपुरे (उपाध्यक्ष, भारतीय विद्या मंदिर, अमरावती) म्हणून लाभले होते. व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. सुरेश बिजवे (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय मोर्शी ) उपस्थित होते. आणि विशेष अतिथि म्हणून मा. डॉ. भिमराव व मा. श्री. चंदनकर (सदस्य.महा. विकास समिति भा.म.वि. मोर्शी ) मा श्री. सुखदेवराव राउत (सदस्य.महा. विकास समिति भा.म.वि. मोर्शी ) मा. श्री. नविनकुमारजी पेठे ((सदस्य.महा. विकास समिति भा.म.वि. मोर्शी ) मा.श्री. नथ्थुजी संपतराव घोंगडे (सरपंच, ग्रामपंचायत पार्डी) मा. फरजाना शेख शहीद (उप-सरपंच, ग्रामपंचायत पार्डी )मा. श्री. विकास सु नवले अध्यक्ष,तंटामुक्ती समिति (ग्रा.पं. पार्डी ) ई विशेष अतिथि शिबिर समारोपाला उपस्थित होते.

**कार्यक्रम अधिकारी**
**रा. सो. यो.**
भारतीय महाविद्यालय, मोर्शी.

**प्राचार्य**
भारतीय महाविद्यालय, मोर्शी.

# विशेष श्रमसंस्कार शिबिराची शंणचित्रे
## (06/02/2020 ते 13/02/2020)

-----------------------------------------------------------------

## पहिला दिवस (०७/०२/२०२०)









# विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन















भारतीय महाविद्यालय, मोर्शी
राष्ट्रीय सेवा योजना



# स्मशान भूमी स्वच्छता मोहीम









# रात्रीचे कार्यक्रम





















भारतीय महाविद्यालय मोर्शी
राष्ट्रीय सेवा योजना
'विशेष श्रमसंस्कार शिबीर'
एक भारत श्रेष्ठ भारत

# दुसरा दिवस (०८/०२/२०२०)

## स्वच्छता प्रभात फेरी









## लैंगिक शोषण विषयावर पथ नाट्य





# रक्तदान शिबिर







# सिकलसेल तपासणी शिबिर








# आरोग्य तपासणी शिबिर





# कार्यक्रम अधिकारी रक्तदान करताना



## दुपारचे सत्र

# श्री. सचिन देशमुख यांनी रासेयो पथकास वनराई बंधारा बांधण्या करिता ५०० पोते आणून दिले





**माननीय प्रा. डॉ. श्री. राजेशजी  बुरंगे (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांची सदिच्छा भेट समवेत माननीय प्रा. डॉ. निलेश कडू ( अमरावती जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) आणि प्रा. डॉ. योगेश पोहोकर (वाशीम जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)**












भारतीय महाविद्यालय मोर्शी
राष्ट्रीय सेवा योजना
'विशेष श्रमसंस्कार शिबीर'
एक भारत श्रेष्ठ भारत


ZENITH
CONCEPT SCHOOL, MORSHI

# रात्रीचे सत्र




ZENITH
CONCEPT SCHOOL, MORSHI

# तिसरा दिवस (०९/०२/२०२०)

## सकाळी योगासन



## प्रभात फेरी









# शिक्षण अधिकार आणि बाल मजुरी या विषयांवर पथ नाट्य











# श्रमसंस्कार










# परिसर स्वच्छता





# दुपारचे सत्र













# सायंकाळी स्वयंसेवकांना खेळा मधून एकता चे शिकवण






# रात्रीचे रंगारंग कार्यक्रम





# चौथा  दिवस (१०/०२/२०२०)

# प्रभात फेरी स्वच्छता मोहीम










# वनराई बंधारा श्रमदान







# दुपारचे सत्र






JAY JAWAN
JAY KISAN


राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME
S.G.B.A UNI





# खेळातून शिकवण









# रात्रीचे सत्र





# पाचवा  दिवस (११/०२/२०२०)

## प्रभात फेरी (अंध  श्रध्दा निर्मूलन पथनाट्य)












# दुपारचे बौद्धिक सत्र














# सायंकाळातील खेळ





# देशभक्ती पार गीत गायन







# सहावा दिवस (१२/०२/२०२०)

## सकाळी योगासन




## प्रभात फेरी आणि बौद्ध विहार स्वच्छता






# श्रमदान





# दुपारचे बौद्धिक सत्र










# सांस्कृतिक कार्यक्रम









# सातवा  दिवस (१३/०२/२०२०)

# समारोपीय कार्यक्रम







## विद्यार्थी मनोगत व्यक्त करतांना




## उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल सन्मान



गावातील लोकांच्या आरोग्य तपासणीचा अहवाल गावातील सरपंच साहेबांना देताना माननीय प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे तथा माजी प्राचार्य डॉक्टर गोपीचंद मेश्राम सर




रक्तदान केल्याचे प्रमाणपत्र स्वीकारताना रा.सो.यो. स्वयसेवक



# उत्कृष्ट गट म्हणून बक्षीस देताना









# 8*8*8 शोषखड्डा




# 4*4*4* शोषखड्डा




# 30*4*4 फूट बंधारा



# प्राथमिक शाळेला मिळालेली कचरा कुंडी स्वत: स्वयंसेवकांनी लावली







**कार्यक्रम अधिकारी**
**रा. सो. यो.**
भारतीय महाविद्यालय, मोर्शी.

**प्राचार्य**
भारतीय महाविद्यालय, मोर्शी.